# वेब साईट वर प्रसिध्द करावयाचे जाहिरात प्रारूप

## जाहिरात

जिल्हा परिषद ,आरोग्य विभाग,नंदुरबार मार्फत नियमित लसीकरण कार्यक्रम बळकटीकरण करण्याकरीता आदिवासी (Aspirational) जिल्ह्यांकरिता विशेष कृती नियोजन अंतर्गत पथनाट्य कार्यक्रम घ्यावयाचे आहेत.

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा व धडगाव या तालुक्यात नियमित लसीकरण कार्यक्रम, गरोदर माता सेवा, संस्थात्मक प्रसुती, स्तनपान, माता सुरक्षित तर घर सुरक्षित, जागरूक पालक सुदृढ बालक कार्यक्रमांबाबत स्थानिक भाषेत प्रसिद्धी करण्याकरीता स्थानिक भाषेत पथनाट्य आयोजित करणारे स्थानिक कलापथक यांचे कडून खालील अटी व शर्ती यांना अधीन राहून अर्ज मागवण्यात येत आहेत.

तक्ता – अ

| अ.क्र. | पथनाट्य सादर करावयाचे कार्यक्षेत्र | एकूण कार्यक्रम | प्रती कार्यक्रम |
|---|---|---|---|
| 1 | धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत गाव व पाडे | 112 | 5000/- |

**अटी व शर्ती**

1. जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद ,नंदुरबार यांच्या नावे अर्ज ,सोबत आवश्यक पूरक कागदपत्र.
2. पथकात किमान 5 कलाकार असणे आवश्यक आहे.
3. पथकास देण्यात येणारे एका कार्यक्रमास रु.5000/-मानधन राहील
4. आपल्या पथकाची नेमणूक फक्त सदर कार्याक्रमांकरीताच निश्चित मानधनावर करण्यात येणार असून आपणास कुठल्याही प्रकारचा शासकीय सेवेबाबत हक्क सांगता येणार नाही.
5. गटाच्या सुरक्षिततेची जबाबदारी पथकाची राहील.
6. कार्यक्रमांसाठी लागणारे साहित्य ( वेशभूषा ,वाद्य इ.) पथकाचे राहील.
7. पथकास नेमून दिलेल्या गाव /पाडे दिलेल्या दिवशीच वेळेत सादर करणे बंधनकारक राहील.
8. आलेल्या सर्व पथकांचे जिल्हास्तरीय समिती व्दारे छाननी करून पात्र पथकांमार्फत जिल्हा परिषद नंदुरबार येथे समिती समोर सादरीकरण करून त्यात पात्र झालेले पथकांना कार्यक्रम वाटप करण्यात येतील.
9. पथकास आदेशित केलेले गावातच कार्यक्रम सादर करावा,कुणासही गाव बदलता येणार नाही व बदलून मिळणार नाही.
10. कार्यक्रमाच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहन व्यवस्था,इंधन व्यवस्था पथकाने करावयाची आहे. जिल्हा परिषद मार्फत कुठल्याही प्रकारच्या वाहनाची अथवा इंधनाची व्यवस्था करण्यात येणार नाही.
11. प्रत्येक कार्याक्रमबाबत संबंधित गावाचे सन्मा. सरपंच,स्थानिक पदाधिकारी,आरोग्य कर्मचारी / अधिकारी,उपकेंद्र / प्रा.आ.केंद्र यांना सादर करावयाच्या कार्यक्रमाबाबत पूर्वकल्पना देण्यात यावी व गाव / पाडे येथे कार्यक्रमाबाबत वातावरण निर्मिती करावी.
12. सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे जिओ टॅग फोटो सादर करावे.
13. प्रत्येक कार्यक्रमाचा स्थानिक ग्रामपंचायत /प्रा.आ.केंद्र /आरोग्य उपकेंद्र यापैकी कुठलाही एक यांच्या स्वाक्षरीचा कार्यक्रम सादर केल्याबाबतचा दाखला सादर करण्यात यावा.
14. पथकाचे मानधन ज्या बँक खात्यात जमा करायचे आहे त्या खात्याचे पासबुक झेरॉक्स प्रत सादर करावी.
15. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ०८.०३.२०२३ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत.

(डॉ.गोविंद पंडित चौधरी )
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

रघुनाथ गावडे ( भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**